# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- २४८६/२०२४

**अपिलार्थी, श्रीम.शमीम बानी नफिस शेख**
नाज टायपिंग सेंटर, गाळा नं.१५१/१
आर पार्टस समोर, काझी चाळ, वल्लीपीर रोड,
कल्याण (प.), जि.ठाणे.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, कर/पाणी
३/क प्रभागक्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली
महानगरपालिका, कल्याण, श्री.स्वामी दामोदराचार्य
हॉल, पहिला मजला, सांगळेवाडी, कल्याण (प.),
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त,
३/क प्रभागक्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली
महानगरपालिका, कल्याण, श्री.स्वामी दामोदराचार्य
हॉल, पहिला मजला, सांगळेवाडी, कल्याण (प.),
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ११.०६.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २७.०३.२०२४ | -- | ०२.०५.२०२४ | ११.०६.२०२४ |

अपिलार्थी यांनी दि. १२.०७.२०२४ रोजीच्या *अर्जान्वये " जन माहिती अधिकारी यांनी माहिती अद्याप दिलेली नाही.* "असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ११.०६.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.धनंजय थोरात, सहाय्यक आयुक्त तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.बळवंत श्रीपती बजागे, प्र.अधीक्षक, कर विभाग, ३/क प्रभाग समिती, कल्याण डोंबिवली महानगरपालिका उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" गाळा क्र.१५१/१ संदर्भात माहिती मिळण्याबाबत.*

*सदर कर बिलाचे अधिकृत मालक श्रीमती शमीम बानो शेख मालमत्ता क्र.C०३००१२७८३०० (सत्यप्रत) असताना सदरचे बिल श्री.अब्दुल रहिम हाकिम खान यांचे नावे पार्वती क्रमांक AS, १,३२/१८ दि.०६.०४.२०२४ रोजी बनवितात. सदर मालमत्ता कराची फेरबदल करण्यांस सादर केलेले सर्व अधिकृत दस्तावेजांच्या छायांकित प्रती मिळणेबाबत."*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले आहे. सदर अपिलावर दि.११.०६.२०२४ रोजी आदेश पारित करुन, संपूर्ण माहिती १५ दिवसात विनामुल्य देण्यात यावी, असे निर्देश दिले आहेत. त्यानंतर आपणास अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, त्यांचे कार्यालय स्थलांतर करण्यात आलेले असल्याने, माहिती देता आलेली नाही. तथापि आपण आता माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देऊ.

वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. प्रस्तुत प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्र.अधीक्षक, कर विभाग, ३/क प्रभाक्षेत्र, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शांताराम तायडे, लिपिक, ३/क प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २७.०३.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०७.०७.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ११ जून, २०२५ .

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शांताराम तायडे, लिपिक, ३/क प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे.

**-यांना प्रत**
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, कर/पाणी
३/क प्रभागक्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण, श्री.स्वामी दामोदराचार्य हॉल, पहिला मजला,
सांगळेवाडी, कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.
**यांचे मार्फत प्रत रवाना.**